## कुणि कोडे माझे उकलिल का?

- कविवर्य भा. रा. तांबे

कुणि कोडे माझें उकलिल का ?
कुणि शास्त्री रहस्य कळविल का ? ॥धृ.॥

हृदयि तुझ्या सखि, दीप पाजळे,
प्रभा मुखावरी माझ्या उजळे,
नव रत्ने तूं तूज भूषविलें,
मन्मन खुले आंतिल का ? ॥१॥

गुलाब माझ्या हृदयी फुलला,
रंग तुझ्या गालांवर खुलला;
कांटा माझ्या पायीं रुतला,
शूल तुझ्या उरिं कोमल का ? ॥२॥

माझ्या शिरीं ढग निळा इवरला,
तुझ्या नयनि पाऊस खळखळला;
शरच्चंद्र या हृदयी उगवला,
प्रभा तुझ्या उरीं शीतल कां ? ॥३॥

मद्याचा मी प्यालों प्याला
प्रिये, तयाचा मद तुज आला:
कुणी जखडिलें दोन जिवांला
मंत्रबंधनी केवळ का ? ॥४॥

विलक्षण झपाट्याने धावणारे आजचे हे यंत्रयुग ! माणसाची इच्छा आणि ऐपत असेल तर त्याच्यापुढे सर्व सुखांची आरास मांडणारे हे युग आहे. पण तरीही आजचा माणूस सर्वस्वी सुखी आहे, असे म्हणायला मात्र थोडी भीती वाटते. कारण या यंत्रसुगाच्या अंतरंगात एक थंड, निर्विकारपरा आहे. मानवी जीवनात एकाकी किंवा तुटक होऊन जगणारी एक वास्तवता आहे. कुठेतरी माणसाच्या भावनिक आनंदाचा कोंडमारा आहे. अशा वेळी जर त्याच्यापुढे निखळ सुंदर, हृदयंगम आणि ओलावणाऱ्या भावनांचे एखादे रंगीत इंद्रधनु उभे राहिले तर ? कविवर्य भा. रा. तांबे यांचा हा काव्य परिचय आज त्या इंद्रधनुचेच आनंदरम्यरुप साकारणार आहे.

कविवर्य भा. रा. तांबे हे सौंदर्यवादी परंतु चिंतनशील कवी. मानवी भावांशी ते फार चटक्न एकरुप होत. म्हणूनच की काय, त्यांचे भाव-क्षेत्र स्वत:पुरते मर्यादित न राहता विशाल होत गेले.

प्रेम हा त्यांच्या श्रद्धेचा विषय होता. ते त्याविषयी म्हणतात, ''सारे दृश्य विश्व.... अनंत सौंदर्याची, आनंदाची, प्रेमाची वार्ता सांगत असते.'' तांब्यांचा हा उन्मेष त्यांच्या प्रत्यक्ष जीवनातील प्रेमाच्या सुंदर अनुभूतीतून आलेला आहे. त्यांच्या साऱ्या प्रेमकाव्याबद्दल बोलताना ते म्हणतात, ''All my love songs could be produced because of

my love for my wife.'' (राजकवी तांबे यांचा साहित्यविषयक पत्रव्यवहार - संपादक बा. ना. पराडकर, पृ. क्र. १०)

## तांब्यांना पडलेले कोडे

'कुणि कोडे माझे उकलिल का ?' या कवितेत प्रत्येक कडव्यात शेवटी कवीने एक प्रश्न विचारला आहे. पण या प्रश्नांची गंमत अशी आहे, की त्याचे उत्तर त्या प्रश्नातच आहे. ते ओळखण्यासाठी आपल्याकडे एक सजग चातुर्य पाहिजे. हे उत्तर मिळताच वाचकाला एक मनोहर आनंदमय अनुभव स्पर्श करुन जाईल.

तांब्यांनी या कवितेत प्रेमिकांच्या बाबतीत होणाऱ्या उलट प्रतिक्रिया सुरेख शब्दात मांडलेल्या आहेत. उदा.

✻ सखीच्या हृदयातील दिव्याची प्रभा माझ्या मुखावर कशी उजळते ?

✻ ती नवरत्नांनी सजते पण मन मात्र माझे खुलते.

✻ काटा माझ्या पायात तर वेदना तिच्या उरात कशी ?

हे दोन जीव एकमेकात एवढे विरघळलेले आहेत की त्यांच्या अगदी छोट्या छोट्या सुख-दु:खाच्या भावनाही सहजपणे एकमेकांच्या अनुभवाला येतात. ही एकरुपता हे त्यांच्या या उलट प्रतिक्रियांचे रहस्य आहे.

## तांब्यांच्या प्रतिमांचे वैशिष्ट्य

वास्तविक दु:ख काळ्या रंगाने सूचित केले जाते. पण तांबे इथे 'ढग निळा' असे म्हणतात. पत्नीच्या डोळ्यातील अश्रूंना 'पाऊस खळखळला' असे म्हणतात. उरातील वेदनाही ते 'कोमल' करतात. तांब्यांच्या या प्रतिमा केवळ शारीरिक पातळीवरील प्रीतीच्या राहात नाहीत. तर तो त्यांचा अस्सल जीवनानुभव असल्याने या प्रतिमाही दोन आत्म्यांचे एकत्व सूचित करतात. व्यावहारिक संसारात या पती-पत्नींनी एकमेकांची संकटे निष्ठेने भोगलेली आहेत. एकमेकांवर त्या संकटांच्या माऱ्यात सावली धरलेली आहे. आणि त्या सावलीमुळे दु:खाच्या झळा कुठल्या कुठे पळाल्या आहेत. त्या दु:खालाही सुखरुप प्राप्त झाले आहे. हेच या कवितेतल्या कोड्यांचे रहस्य असावे असे वाटते.

## तांब्यांचा प्रेमाचा संदेश

पती-पत्नी एकमेकांच्या सुख-दु:खात जेवढे विरघळून जातील, तेवढे त्यांचे प्रेम निर्मळ, विशाल इंद्रधनु, आपल्याही अवतीभवती नकळत रंगांची उधळण करु लागते. तांब्यांचे वैवाहिक जीवन आपल्यापुढे सहजच एक 'रोल मॉडेल' उभे करते. 'त्यावेळी माणसाजवळ प्रेम करायला वेळ होता, आज कुठे आहे ?' असे म्हणणे ही सोयीची पळवाट ठरेल. प्रेम करण्यासाठी एक संवेदनामय, तरल असे अंतरंग लागते. तेच आपण हरवत चाललोय की काय ? या प्रश्नाचे उत्तर आपणच शोधायला हवे. मानवी मनासाठी 'प्रेम' ही एक चिरंतन भावना आहे. माणसाला मिळालेली ती एक अमूल्य देणगी आहे. ही अमूल्य देणगी सांभाळता आली तर तांब्यांचे हे कोडे आपल्यालाही उलगडेल.

सौ. जयश्री नातू

मोबाईल : ९६५७०३२५२७

jayashrinatu@gmail.com